## महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

3729

जा.क्र.जिउनि/सावकारी/अवैद्य.क.१८ /२०१४
कार्यालयः-जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
औरंगाबाद दि. २८.११.२०१४.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD ★ DIST. AURANGABAD ★ सत्यमेव जयते

वाचाः- १. श्री.शेख नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापूर जि.औरंगाबाद यांचा अवैध सावकारी बाबत अर्ज दि.३.२.२०१४

२. मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचे कार्यालयाचे पत्र दि.३.२.२०१४.

३. या कार्यालयाचे पत्र दि.१०.२.२०१४.व २५.२.२०१४.

४. सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था ता.गंगापूर यांचा चौकशी अहवाल दि.२१.४.२०१४.

५. या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी नियमन अध्यादेश २०१४ चे कलम ४८ कार्यवाही पुर्व नोटीस दिनांक २७.०५.२०१४, २३.०६.२०१४, ०४.०७.२०१४, २३.०७.२०१४

६. या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी नियमन अद्यादेश २०१४ चे कलम १८ अन्वये नोटीस दिनांक १६.८.२०१४

७. वाचा क्र.५ नुसार निर्गमित केलेल्या नोटीसीस अनुसरून या कार्यालयात घेण्यात आलेली सुनावणी दिनांक २७/८/१४,१२/९/१४,१९/९/१४,२३/९/१४,७/१०/१४.

८. सौ.मंगल नानासाहेब चौधरी ,यांचा अर्ज दि.२२/८/१४.

९. वसंत रतन निकम यांनी त्यांचे वकील श्री योगेश आर पल्लोड यांचेमार्फत दाखल केलेला विनंती अर्ज दि.२७/८/१४

१०. या कार्यालयाने दैनिक दिव्य मराठी मध्ये दिनांक १४/सप्टेबर २०१४ रोजी प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटन

श्री.शेख नसिर शेख हुसेन
रा.मु.डोमेगांव ता.गंगापुर जि.औरंगाबाद. — अर्जदार

**विरुध्द**

१.श्री.दत्तात्र्य माणीकराव लांडगे
रा.मु.डोमेगांव ता.गंगापुर जि.औरंगाबाद — गैरअर्जदार
२.सौ.मंगल नानासाहेब चौधरी
रा.भिमनगर भाऊसिंगनगर औरंगाबाद.
३.श्री.वसंत रतन निकम
रा.घाटी गौतम नगर औरंगाबाद
४.सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,गंगापुर
तथा प्राधकृत अधिकारी.

ज्या अर्थी वाचा क्रमांक (१) अन्वये श्री.नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांनी दिनांक ०३/०२ २०१४ रोजी लोकशाही दिनामध्ये टोकन क्र.२९५ नुसार सावकाराच्या पाशातुन मुक्त करणे बाबत

मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे तक्रार अर्ज सादर केलेला आहे. या तक्रारीत श्री.शेख नसिर शेख हुसेन शेख यांनी सावकार व त्यांच्यांत झालेल्या व्यवहाराची व साक्षदाराची सविस्तर माहिती नमुद केलेली आहे. त्यांचा तपशील थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

- सावकाराचे नाव :- श्री दत्तात्रय माणिकराव लांडगे रा.डोमेगांव ता.गंगापूर
- सावकाराकडून घेतलेले कर्ज : रु.१३०००/- मासिक व्याज ५ टक्के
- कर्ज घेतल्याचे वर्ष दिनांक २७.०३.१९९८ व सावकाराला आज पर्यंत परत केलेली मुद्दल व व्याज रक्कम रु.४००००/-
- सावकाराला लिहून दिलेली गहाण मालमत्ता शेतजमीन गट क्र. ११ मधील क्षेत्र ४० आर.(१ एकर)
- सावकारी व्यवहारातील साक्षीदार १) शहाजी तात्याबा सुसलादे २)शेख सुबान नबाब शेख ३)आबाराव माणीकराव सुसलादे.
- गहाण मालमत्ता खरेदी करणाऱ्यांचे नाव १) श्री.दत्तात्रय माणीकराव लांडगे २) सौ.मंगलाबाई नानासाहेब चौधरी रा.भिमनगर भाऊसिंगपुरा औरंगाबाद ३) श्री.वसंत रतन निकम घाटी गौतमनगर औरंगाबाद .

ज्या अर्थी, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे समोर लोकशाही दिनात प्राप्त झाल्याने सदरचा अर्ज मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे वाचा क्र. २ पत्र जा.क्र.२०१४/साशा/लोदि ०२/कावि/दिनांक ०३.०२.२०१४ नुसार या कार्यालयाकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविलेला आहे. त्या नुसार या कार्यालयाने सदरचा तक्रार अर्ज चौकशीस्तव वाचा क्र.३ नुसार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.गंगापूर यांचेकडे पाठविलेला असून त्यावर चौकशी करून अभिप्रायासह चौकशी अहवाल सादर करणे बाबत त्यांना कळविलेले होते.

ज्या अर्थी, वाचा क्र.३ नुसार दिलेल्या सुचने प्रमाणे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांनी वाचा क्र. ४ नुसार त्यांचा चौकशी अहवाल अभिप्रायासह या कार्यालयास सादर केलेला आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात नमुद केले आहेत की, तक्रारदार श्री.नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापूर यांना पत्र देऊन महाराष्ट्र सावकारी नियमन अध्यादेश २०१४ नुसार चौकशी करीता समक्ष जबाब नोंदविण्यासाठी त्यांनी कळविलेले होते. त्या नुसार श्री.नसिर शेख हुसेन यांनी दिनांक ०३.०३.२०१४ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांचे समोर जबाब नोंदविलेला आहे. त्या जबाबात श्री.नसिर शेख हुसेन यांनी नमुद केले आहे की, त्यांनी त्यांचे गावातील श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांचेकडून मुलीचे लग्नासाठी रु.१३०००/- शेकडा ५ टक्के प्रमाणे व्याजाने सन १९९८ मध्ये घेतलेले होते व त्या बद्दल धर म्हणून त्यांनी त्यांची डोमेगांव शिवारातील गट नं.११ मध्ये १ एकर जमीन दिनांक २७.०३.१९९८ रोजी नोंदणीकृत खरेदी खत करुन दिलेले आहे. घेतलेल्या रक्कमेपोटी गैरअर्जदार श्री. श्री.दत्तात्र्य माणीकराव लांडगे रा.मु.डोमेगांव ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांना रु.२५०००/- दोन टप्यात परत केलेले आहेत. या वेळी श्री.आबाराव माणिकराव सुसलादे माजी सरपंच यांच्या हाताने सदर रक्कम दिलेली आहे. परंतु त्या नंतर सतत मागणी करून देखील श्री.लांडगे यांनी जमीनीचे खरेदीखत परत करुन दिलेले नाही. व ते नेहमी गावाबाहेर राहात असल्याने खरेदीखत परत करुन देण्यास त्यांनी टाळाटाळ केलेली आहे. या नंतर ते एकदा गावात आल्यावर त्यांना जमीन परत करण्यास सांगीतले असल्यास होकार देऊन रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर जमीनीचा फेरफार करण्यास त्यांच्या नावाने करण्यांस संमती घेतली. व आडाणी पणाने त्यांनी त्यावर सही केली. तसेच सदर जमीन श्री.लांडगे यांनी श्रीमती मंगल नानासाहेब चौधरी रा.औरंगाबाद यांना सन २०१३ मध्ये परस्पर विक्री केलेली आहे. ही बाब त्यांना जमीन घेणाऱ्या श्रीमती चौधरी या जमीनीचा ताबा घेण्यासाठी शेतावर आल्या नंतर समजले. सदर

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD ★ DIST. AURANGABAD ★ सत्यमेव जयते

जमीन १९९८ पासून त्यांचे ताब्यात असून ते त्या ठिकाणी घर करून राहात आहे. तसेच जमीनीचा फेर १९९८ नंतर २०११ मध्ये झालेला असून त्यांची फसवणुक करून स्टॅम्प पेपरवर सह्या घेतल्या नंतर झाला आहे. व जमीनीचा ताबा त्यांच्याकडे असताना परस्पर तिसऱ्या व्यक्तिस जमीन विक्री केलेली आहे. या बाबत झालेला व्यवहार हा सावकारी रक्कमे पोटी झालेला असून त्यासाठी साक्षीदार श्री.आबाराव माणिकराव सुसलादे हे आहेत. वरील प्रमाणे जबाब श्री.शेख नसिर शेख हुसेन शेख यांनी दिलेला असून दिनांक २५.०३.२०१४ रोजी पुन्हा रु.२००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन दिलेले आहे.

REGISTRAR OF MONEY LENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

तसेच या व्यवहारातील साक्षीदार श्री.आबाराव माणिकराव सुसलादे यांनी दिनांक २७.०३.२०१४ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांचे समक्ष हजर राहून लेखी जबाब सादर केलेला आहे. त्या नुसार श्री.शेख नसिर शेख हुसेन शेख यांनी श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांच्याकडून रु.१३०००/- चे कर्ज सन १९९८ मध्ये व्याजाने घेतलेले असून त्यांचे समोर श्री.लांडगे यांना रु.२५०००/- दोन वर्षानंतर परत केलेले आहेत. त्या प्रमाणे जमीनीचे खरेदी खत परत करण्याचे त्यानी कबूल केले व त्यासाठी श्री.शेख नसिर शेख हुसेन व त्यांना दुय्यम निबंधक कार्यालय गंगापूर येथे बोलविले परंतु ते स्वतः आले नाही. ते सतत गावाबाहेर असल्याने, व त्यांचा पत्ता लागत नसल्याने श्री.सुसलादे हे त्यांच्या बहीनीकडे निफाड येथे स्वतः गेले असता श्री.लांडगे हे पुण्याकडे गेलयाचे कळाले. त्या नंतर बऱ्याच दिवसा पासून लांडगे गावातआलेले नाही. श्री.नसिर शेख हुसेन व श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांच्यातील झालेला व्यवहार हा सावकारी मधुन झालेला असून श्री.शेख नसिर शेख हुसेन यांची शेत जमीन त्यांना परत न करता त्यांची फसवणुक केलेली आहे. असा जबाब दिला असल्याचे अहवालात नमुद आहे.

वरील प्रमाणे अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन व व्यवहारातील साक्षीदार यांचे जबाब झाल्या नंतर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांनी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ प्रमाणे अवैध सावकारी करणारे सावकार श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांचे राहाते घराची घर झडती घेण्यासाठी दिनांक २५.०३.२०१४ चे पत्रान्वये त्यांचे कार्यालयातील श्री.एस.डी.हावळे तत्कालीन सहकार अधिकारी श्रेणी-२ यांचे पथकाची नियुक्ती केलेली होती. त्या नुसार श्री.हावडे हे दिनांक २७.०३.२०१४ रोजी डोमेगांव ता.गंगापूर येथे गेले असता सदरील सावकार श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे हे डोमेगांव येथे राहात नसुन त्यांचे गावात कोणीही जवळचे नातलग नाही. तसेच त्यांचे स्वतःचे घर नाही व इतर कोणतीही मालमत्ता नाही. असे गावातील पंचा समक्ष पंचनामा केल्या नंतर निदर्शनास आलेले आहे. व त्याबाबतचा अहवाल पंचनाम्यासह श्री.हावळे यांनी दिनांक २८.०३.२०१४ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांना सादर केलेला आहे. उक्त प्रकरणी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांनी त्यांचे जबाबात नमुद केले आहेत की, श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी जबाबाच्या वेळी सादर केलेले सबंधीत गट क्र .११ मधील शेत जमीनी मधील सातबारा उत्तारा नुसार सन १९९८ पुर्वी तसेच सन २००९-२०१० पर्यंत सातबाऱ्या मध्ये श्री.नसिर शेख हुसेन यांच्या नावाची नोंद आहे. तसेच ते स्वतः जमीन कसत असल्याचे नमुना नं.१२ मध्ये नोंद आहे. तसेच या जमीनीचा फेर दिनांक १०.०९.२०११ फेर क्र.९२८ अन्वये संबंधीत गावचे तलाठी यांनी शेख नसिर शेख हुसेन शेख यांचे नावावरुन श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे याच्या नावाने नोंदविलेला आहे. तथापि त्यामध्ये खरेदीखत क्र.६२१ नमुद केलेला आहे. खरेदी दिनांकाचे वर्ष नमुद केलेले नाही. केवळ २७.३ असे नमुद केलेले आहे. श्री.नसिर शेख हुसेन यांनी सन १९९८ मध्ये खरेदी खत क्र.६२१ दिनांक २७.३.१९९८ नुसार दुय्यम निबंधक कार्यालयात श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांना खरेदीखत करून दिल्याचे खरेदीखत नक्कल वरुन दिसून येते. म्हणजे या जमीनीचा फेर १३ वर्षा नंतर झालेला असून जमीनीचा ताबा अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन शेख यांच्याकडे सन १९९८ पासून आज पर्यंत आहे. सदर शेतजमीन ही रु.१७५०००/- मध्ये श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांनी सौ.मंगल नानासाहेब चौधरी

यांना खरेदीखत क्र.१५१५ दिनांक ०१.०४.२०१३ नुसार कायम स्वरुपी विक्री केल्याचे फेरफार नोंदवही वरील नोंद क्रमांक १००८ दिनांक ०३.०४.२०१३ नुसार नोंदविलेला आहे.

वरील प्रमाणे माहिती चौकशी अहवालात नमुद करून त्यांनी या बाबत अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन व साक्षीदार यांचे जबाब जमीनीचे खरेदीखत व त्यांचे फेर नोंदविण्या बाबतचा कालावधी व अर्जदार यांचा जमीनीवरील ताबा याबाबी वरुन सदरील प्रकरणात सावकारी स्वरुपाचा व्यवहार झालेला असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आल्या बाबत त्यांचे चौकशी अहवालात व अभिप्रायात नमुद केले आहे.

या चौकशी अहवाला सोबत त्यांनी मुळ संचिका पाने क्र. १ ते ३१ सादर केलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,गंगापुर यांचे पत्र दिनांक १८/२/२०१४.
२) या कार्यालयाचे पत्र दिनांक १०/२/२०१४.
३) अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी लोकशाही दिनांत टोकन क्र.२९५ दि.३/२/१४ रोजी दिलेला अर्ज.पान क्र.१ व २.
४) गांव नमुना १२ चा उतारा.
५) अर्जदार श्री.नसिर शेख हुसेन यांनी मा.तहसिलदार गंगापूर यांना लिहिलेला अर्ज दिनांक ०९.१२.२०१३ पान क्र. १ व २
६) गाव नमुना सातबारा उत्तारा गट क्र.११ सन २०११-२०१२ चा
७) शेत जमीनीचे नोंदणीकृत खरेदीखत क्र.६२१ दिनांक २७.०३.१९९८ पान क्र. १ ते ५
८) गाव नमुना सातबारा उत्तारा गट क्र.११ दिनांक २०.०२.२०१३
९) गाव नमुना सातबारा उत्तारा गट क्र.११ सन २०११-२०१२
१०) गाव नमुना क्र. ७, ७-अ, व १२ गट क्र.११ चा सन १९७४-७५ ते सन २००९-२०१० पर्यंत पान क्र. १ ते ३
११) गाव नमुना ७ गट क्र.११ दिनांक २०.१२.२०१३
१२) फेरफाराची नोंदवही (फेरफारपत्रक) पान क्र. १ व २
१३) श्री.शेख नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव यांनी दिनांक ०३.०३.२०१४ रोजी दिलेला जबाब पान क्र.१ते ३
१४) श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी दिनांक २५.०३.२०१४ रोजी दिलेले प्रतिज्ञापत्र
१५) सावकाराचे निबंधक तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांचे पत्र दिनांक २५.०३.२०१४
१६) श्री.आबाराव माणिकराव सुसलादे यांचा जबाब दिनांक २७.०३.२०१४ पान क्र.१ ते २
१७) श्री.हावळे श्रीकांत ज्ञा. यांचे पत्र दिनांक २८.०३.२०१४ व त्यासोबतचा पंचनामा पान क्र. १ ते २.
१८)

ज्या अर्थी, वाचा क्र. १ नुसार श्री.शेख नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापूर यांनी दिलेल्या तक्रार अर्जा नुसार वाचा क्र. ४ नुसार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर ता.गंगापूर जि.औरंगाबाद यांनी अहवाल सादर केलेला असल्याने या कार्यालयाने वाचा क्र. ५ नुसार अर्जदार श्री.नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापूर जि.औरंगाबाद व गैरअर्जदार श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे रा.डोमेगांव ता.गंगापूर यांना महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम चे कलम ४८ नुसार कार्यवाही पुर्व नोटीस देऊन त्याची प्रत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गंगापूर यांना देऊन याप्रकरणी दिनांक १०.६.२०१४ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता सुनावणी ठेवलेली होती. उक्त सुनावणीस श्री.नसिर शेख हुसेन व त्यांच्या सोबत श्री. आबाराव माणिकराव सुसलादे

श्री.शाहाजी तात्याबा सुसलादे व श्री भालचंद्र अनंतराव भाटवडेकर तसेच सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था गंगापुर हे सुनावणीस हजर होते. या सुनावणीच्या वेळी श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी त्याची बाजू मांडताना सांगीतले की, त्याची शेत जमीन गट क्र.११ शिवार डोमेगांव येथील १ एकर जमीन श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे [illegible] स्वरुपात देऊन त्यांचेकडून मुलीचे लग्नासाठी रु.१३०००/- शेकडा ५ टक्के प्रमाणे घेतली होती व श्री.शेख नसिर शेख हुसेन यानी श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांना व्याजासह रु.२५०००/- श्री.आबाराव माणिकराव सुसलादे यांचे समोर परत केले. असे नमुद केले. परंतु श्री.लांडगे यांनी त्यांना जमीन परत न करता परस्पर सौ.मंगलाबाई नानासाहेब चौधरी यांना सन २०१३ मध्ये विकली आहे. ही जमीन सन १९९८ पासून त्यांचे ताब्यात असून सातबाऱ्यावरील पिक पेऱ्याच्या नोंदी त्यांच्या नावाने आहे. सन २०१३ मध्ये सौ.मंगलाबाई नानासाहेब चौधरी या जमीनीचा ताबा घेण्यासाठी आल्यावर सदर जमीन विक्री झाल्याचे त्यांना समजले. या जमीनीत ते घर करून राहात असून अद्याप पर्यंत सदर जमीनीचा ताबा त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे हा व्यवहार सावकारीचा असून या मध्ये साक्षीदार असलेले श्री.आबाराव माणिकराव सुसलादे यांनी देखिल लेखी जवाब दिलेला आहे.त्याप्रमाणे या प्रकरणात सावकारी झाली असल्या बाबत व जमीनीचा ताबा त्यांचेकडेच असल्याने नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी असे नमुद केले.

तसेच लांडगे हे गावात राहत नसुन त्यांचा पत्ता उपलब्ध नाही तसेच जमीन घेणारे सौ.मंगलाबाई चौधरी यांचा देखील पत्ता नाही त्यामुळे पत्ता उपलब्ध करुन देण्यासाठी मागणी केली तसेच त्यांचे सोबत असलेल्या वरील नमुद केलेल्या साक्षीदारानी देखील अर्जदार यांच्या वतीने बाजु मांडली या प्रकरणी अर्जदार यांनी पुरावे सादर करणे साठी पुन्हा संधी द्यावी असी विनंती केल्याने या प्रकरणी पुढील सुनावणी २४/६/२०१४ रोजी ठेवण्यात आलेली होती.व तद्नंतर दिनांक ५/७/२०१४,११/७/२०१४ व ५/८/२०१४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.तसेच दिनांक १२/८/२०१४ पुन्हा सुनावणी घेण्यात आली .यावेळी अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन शेख व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,गंगापुर हे उपस्थित होते व गैरअर्जदार हे अनुपस्थित होते.अर्जदार यांनी समक्ष युक्तीवाद केला की,जमीन माझ्या ताब्यात असुन ते आज रोजी शेतातच रहातात त्यामुळे त्यांनी जमीन परत मिळावी अशी विनंती केल्याने या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये नोटीस देऊन पुढील सुनावणी २७/८/२०१४ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २७/८/२०१४ च्या सुनावणीस अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन व सहायक निबंधक,सहकारी संस्था,गंगापुर हे हजर होते तसेच गैरअर्जदार श्री.दत्तात्र्य माणिकराव लांडगे हे गैरहजर होते.सदर प्रकरणात जमीनीचा व्यवहार श्री.शेख नसिर शेख हुसेन शेख व श्री लांडगे यांच्याशी झल्यानंतर श्री.लांडगे यांनी सदर जमीन सौ.मंगलबाई नानासाहेब चौधरी यांना खरेदी खताव्दारे दिनांक १/४/२०१३ रोजी नोंदणी करुन दिल्याचे आढळुन आल्याने त्यांना गैरअर्जदार क्र.२ करण्यात येऊन सुनावणीस बोलविण्यात आलेले होते.त्यानुसार त्या सुनावणीस उपस्थित राहिल्या तसेच सुनावणी दरम्यान श्री.वसंत रतन निकम यांनी ॲड.योगेश पल्लोड यांचे वकीलपत्र देऊन त्यांना या प्रकरणात गैरअर्जदार करणे बाबत विनंती केली.सदर विनंतीच्या पृष्ठार्थ श्री.वसंत निकम यांनी गैरअर्जदार क्र.२ सौ.मंगल चौधरी यांचे कडुन सदर जमीनीचे खरेदी खत दिनांक २६/६/२०१४ रोजी केले बाबतची प्रत जोडली.सदर खरेदी खत २६/६/२०१४ अन्वये नोंदणी कृत आहे.अर्जदार यांची तक्रारीतील जमीन गैरअर्जदार क्र.१ श्री.दत्तात्रय माणीकराव लांडगे नंतर गैरअर्जदार क्र.२ सौ.मंगलबाई नानासाहेब चौधरी व गैरअर्जदार क्र.३ श्री.वसंत रतन निकम यांचे पर्यंत खरेदी खताने व्यवहार झाल्याचे आढळुन आल्याने श्री.वसंत निकम यांना गैरअर्जदार क्र.३ करण्यात आले.गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी विनंती केली की,मुळ अर्जदार यांची तक्रार व ज्याअधारे सदर गैरकायदेशिर सावकारी प्रकरण चालु केले आहे,त्याचे कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावे. त्यानुसार याबाबत चौकशी अधिकारी तथा सावकाराचे सहाय्यक निबंधक, गंगापुर यांनी सदर तक्रारींच्या संबधाने

केलेल्या चौकशीचा अहवाल व जाब जवाब ७/१२ आणि अर्जदाराचा पेरा असल्याबाबतचा ७/१२ इत्यादी कागदपत्रे गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना सुनावणीच्या वेळी समक्ष देण्यात येऊन पुढील सुनावणी दिनांक १२/९/२०१४ रोजी ठेवण्यात आली.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD * DIST. AURANGABAD * सत्यमेव जयते

दिनांक १२/९/२०१४ च्या सुनावणीस श्री.शेख नसिर शेख हुसेन व त्यांच्या वतीने अॅड.श्री.जायगुडे गैरअर्जदार क्र.२ सौ.मंगलाबाई चौधरी व गैरअर्जदार क्र.३ श्री.वसंत रतम निकम व त्यांच्या वतीने अॅड.श्री.योगेश पल्लोड हे हजर होते.गैरअर्जदार क्र.१ हे गैरहजर राहिले.गैरअर्जदार क्र.२ यांनी लेखी स्वरुपात म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितल्याने दिनांक १९/९/२०१४ रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आली.दिनांक १९/९/२०१४ रोजी सुनावणी न झाल्याने या प्रकरणी २३/९/२०१४ रोजी पुढील सुनावणी घेण्यात आली.यावेळी सुनावणीस गैरअर्जदार क्र.२ यांनी हजर राहून त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे.गैरअर्जदार क्र.३ यांचे वतीने अॅडव्होकेट श्री.योगेश पल्लोड हजर होते तसेच अर्जदार यांचे तर्फे अॅडव्होकेट जायगुडे हजर होते.गैरअर्जदार क्र.१ श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे हे सुनावणीस सतत गैरहजर राहिलेले असल्याने व त्यांच्या सुनावणी,नोटिसा,त्यांचा पत्त्यावर बजावून परत आलेल्या आहेत.म्हणून दि.१४/९/२०१४ रोजी दैनिक दिव्य मराठी या वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्दीस देवून सुनावणीस उपस्थित राहणेबाबत आवाहन करण्यात आले.तथापि त्यांनी दि.१९/९/२०१४,दि.२३/९/२०१४,दि.७/१०/२०१४ च्या सुनावणीस उपस्थित राहून म्हणणे मांडलेले नाही यावरून त्यांना या प्रकरणी काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरून अर्जदार, गैरअर्जदार प्राप्त लेखी म्हणणे वर युक्तीवादासाठी अंतिम सुनावणी दि.७/१०/२०१४ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७.१०.२०१४ रोजी झालेल्या सुनावणीत अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन हजर गैरअर्जदार क्र.१ गैरहजर, गैरअर्जदार क्र.२ हजर,गैरअर्जदार क्र. ३ यांचे वतीने त्यांचे अॅड श्री.योगेश पलोड हजर होते. सुनावणीचे वेळी अर्जदाराच्या वतीने त्यांचे अॅड. श्री.जायगुडे यांनी प्रतिपादन केले की, चौकशी अधिकाऱ्याने चौकशी केली त्या नुसार सद्यःस्थिती मध्ये सदर जमीनीचा ताबा खरेदीपूर्वी व खरेदी नंतर व आज पर्यंत अर्जदाराचा आहे. गैर अर्जदार क्र.१ व २ यांनी त्यांचे लेखी म्हणने बाबत काही आक्षेप घेतलेले नाही. पोलीस स्टेशनच्या दि.७/३/२०१४ तक्रारी मध्येही ताब्या बाबत काहीही म्हणने नाही. फेरफार खरेदीखत दि.२७/३/१९९८ नंतर १३ वर्षानंतर दि.१०/९/२०११ मधे झालेला आहे. मुळ सावकार श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे हे तक्रारी बाबत माहित असूनही गैर हजर राहीलेले आहेत. सावकारीच्या व्यवहारासाठी असणारे योग्य ते घटक या प्रकरणा मध्ये समाविष्ट आहेत. तसेच सदरचे खरेदीखत नसुन गहाण खत आहे. गैर अर्जदार क्र. २ चे म्हणण्या मध्ये गैर अर्जदार क्र. १ यांच्या बाबत जी काही विशेष माहिती सांगीतलेली आहे ती गैर अर्जदार क्र. २ यांना कोणत्या मार्गाद्वारे उपलब्ध झाली त्याचा कोणताही उल्लेख नाही. गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी चौकशी अहवाल तसेच कलम १८ ची नोटीस बाबत कोणताही जोरदारआक्षेप घेतला नसल्याने कलम १८ प्रमाणे कार्यवाही व्हावी अशी विनंती केली. व याच्या पुष्ठयार्थ मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्याय निवाडे पुढील प्रमाणे दाखल केले. जसे **1)** AIR १९८६ BOMBAY १९३ **२)** २००६ (६) ALL MR ३६९ **३)** २००६ (१) ALL MR २२५ (S.C.) **४)** २०१२ (३) ALL MR ७६० **५)** १९९९ (२) ALL MR ८५ **६)** २००५ (१) ALL MR ८०६ **७)** २००५ (१) ALL MR १७२ **८)** २००८ ALL SCR १३४६.

**ज्या अर्थी, वाचा क्र. ८ नुसार सौ.मंगलाबाई नानासाहेब चौधरी यांनी हजर होऊन त्यांनी या प्रकरणी त्यांना काही नोटीस प्राप्त नसून या प्रकरणी म्हणने मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती केल्याने त्यांना सुनावणी नुसार गैरअर्जदार क्र. २ करुन घेण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांनी लेखी म्हणणे** सादर करून तोंडी युक्तीवाद केला की, तक्रारदार यांनी मुदतीत तक्रार दाखल केलेली नाही व सावकारी बाबत

कोणताही पुरावा दिलेला नाही. तक्रारदाराच्या सोबतचा साक्षीदार श्री.आबाराव माणिकराव सुसलादे माजी सरपंच हे त्यांच्या साक्षीत सहभागी होत नाही. तक्रार अर्जदार यांनी खरेदीखत खोटे आहे म्हणून मा.न्यायाधिशाकडून जाहिर करुन घेतलेले नाही.

**ज्या अर्थी, वाचा क्र .९ नुसार या प्रकरणात वसंत रतन निकम यांनी त्यांचा संबंध असल्याने लेखी पत्र देऊन विनंती केल्याने त्यांना सुनावणी नुसार गैरअर्जदार क्र. ३ करुन घेण्यात आलेले आहे. त्यांनी** प्रतिपादन केले की, श्री.शेख नसिर शेख हुसेन व श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांच्या मधील व्यवहारामधे गहाण खत व शर्त खरेदी बाबतचा उल्लेख नाही. खरेदीखता मध्ये ताबा दिल्याचा व मालकी हक्क दिल्याचा उल्लेख आहे. तक्रारदाराने गैरअर्जदार क्र. १ यांच्या नावाचा फेरफार न झाल्याचा गैर फायदा घेतला आहे. फेर फार करुन घेणे ही जबाबदारी दुय्यम निबंधक व तलाठी यांची कलम १५४ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमा मध्ये आहे. याचा पृष्ठयार्थ मुंबई उच्च न्यायालयातील निर्णयाचे सायटेशन सन २००८ (२) MhLj ८१९ दाखल केले. तक्रारी मध्ये खरेदीखत हे दिनांक २७.०३.१९९८ रोजी झालेले आहे. व तक्रार ही प्रथमत: दिनांक ०३.०२.२०१४ रोजी दाखल केलेली आहे. करीता कलम १८ महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ प्रमाणे चौकशी करता येत नाही. सदर व्यवहारात तक्रारी मध्ये अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तिशी बेकायदेशिर सावकारी व्यवहारा बाबत पुरावे नाही.

सदर युक्तीवादावर अर्जदार यांचे वकील यांनी म्हणने मांडले की, महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ कलम १८ प्रमाणे विवादीत जमीनीचा ताबा अर्ज केल्या पासून १५ वर्षाच्या आत सावकाराकडे गेला पाहिजे. परंतु सदर केस मध्ये जमीनीचा ताबा अर्जदाराकडे आहे. व अर्जदाराचे घर सुध्दा विवादीत जमीनी मध्येच आहे. म्हणुन अर्जदाराचा अर्ज मुदतीत आहे. त्यामुळे कलम १८ (२) प्रमाणे मालकी हक्क देण्याची तरतुद आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ कलम १८ (२) हे ताबा व मालकी हक्का संबंधी आहे. अर्जदाराकडे दि.२७.०३.१९९८ रोजीचा खरेदीखताचा मुळ दस्त हा अर्जदाराच्या ताब्यात आहे. व चौकशी अहवाल अर्जदाराच्या बाजूने आहे. व सदर कायद्या खाली आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास असून या प्रकरणी मा.दिवाणी न्यायालयात जाण्याची गरज नाही असे म्हणने मांडले. यावर अर्जदार व गैरअर्जदार क्र.३ यांचे वकील यांनी लेखी युक्तीवाद देण्यासाठी विनंती केल्याने दिनांक १३.१०.२०१४ पर्यंत लेखी युक्तीवाद दाखल करणेकरिता सदर प्रकरण निर्णयासाठी राखीव ठेवण्यात आले.

ज्या अर्थी, गैर अर्जदार क्र. १ या प्रकरणी तक्रार प्राप्त पासून आणि सतत सुनावणीस गैर हजर असल्याने वाचा क्र. १० नुसार दिनांक १४.०९.२०१४ रोजीच्या दैनिक दिव्य मराठी मध्ये जाहिर प्रगटन प्रसिध्द केले असून त्या जाहिर प्रगटनाचा तपसिल खालील प्रमाणे आहे की ज्या अर्थी, श्री.नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापूर जि.औरंगाबाद यांनी त्यांचा तक्रारी अर्ज जो मुळत: मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या कार्यालयांत लोकशाही दिन दिनांक ३.२.२०१४ रोजी गैरअर्जदार श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे रा.डोमेगांव ता.गंगापूर जि.औरंगाबाद. हे अवैधरित्या सावकारी व्यवसाय करीत असल्याबाबतची दि.३.२.२०१४ च्या अर्जान्वये तक्रार सादर केलेली आहे. सदर तक्रारी नुसार सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था ता.गंगापूर तथा चौकशी अधिकारी यांनी दि.२१.४.२०१४ अन्वये चौकशी अहवालात महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १६ नुसार चौकशी करीत असतांना तक्रारदार तसेच साक्षीदार यांनी समक्ष हजर राहून सादर केलेला लेखी जबाब तसेच त्या सोबत सादर केलेले पुरावादर्शक कागदपत्रे तसेच प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला अहवाल पाहता संबंधित सावकार श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे हे डोमेगांव येथे राहात नसून त्यांचा पत्ता

तक्रारदारास देखील माहित नाही.ते सतत गावाबाहेर राहत असल्याचे संबंधित गावातील व्यक्तीने पंचनाम्यात लिहून दिले आहे,त्यामूळे सावकाराचे घराची झडती घेण्याचा प्रश्न उदभवला नाही.तथापि तक्रारदार तसेच साक्षीदार यांचे जबाब आणि खरेदीखत व त्यांचे फेर नोंदवण्याबाबतचा कालावधी तसेच तक्रारदार यांचा जमिनीवरील ताबा या बाबीचे अवलोकन केले असता सदरील प्रकरणात सावकारी स्वरूपाचा व्यवहार झालेला असल्याचे प्रथमदर्शनी निर्दशनास येते असा अभिप्राय /मत नमूद करून पुढील कार्यवाहीस्तव सादर केला आहे.त्यानुसार २७/३/१९९८ रांजीचे मौजे डोमेगांव ता.गंगापुर यंथिल गट न. ११ पैकी १ एकर जमीनीचा व्यवहार सावकारी व्यवहारातुनच झाला असल्याबाबतचे लेखी जबाब प्राप्त नुसार चौकशी निष्कर्षांत नमूद आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

जाहीर प्रगटन दि.१४/९/२०१४ रोजी दैनिक दिव्य मराठी वर्तमानपत्रात देवून गैरअर्जदार क्र.१ श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांचे म्हणणे प्राप्त करण्यासाठी प्रसिध्द करून त्यामधे नमूद केले होते की,डोमेगांव येथिल राहत्या घरी वेळोवेळी आढळुण आले नाही. त्या अनुषंगाने गैरअर्जदार श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे रा.डोमेगांव यांना या जाहिर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, मालमत्ता जी अवैध सावकारीच्या व्यवहारांत खरेदी केली असल्याचे दिसून आल्यामुळे सदर खरेदी खत सावकारीच्या ओघात गैरअर्जदार सावकाराने दिलेल्या कर्जाबद्यल अर्जदाराने गैरअर्जदार अवैध सावकाराना प्रतिभुती म्हणुन दिली आहे असे गृहित धरुन अभिहस्तातंरण अवैध असल्याचे का घोषीत करु नये ? आणि सदर जमिन/मालमत्ता ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळ मालक/तक्रारी अर्जदार यांच्या ताब्यात का देऊ नये ? याबाबत आपले लेखी/तोंडी म्हणणे मांडण्यासाठी दि.१९ /०९/२०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता या कार्यालयांत सुनावणीसाठी आपण स्वतः किंवा अभियोक्त्यामार्फत समक्ष सादर करावे. सदर दिवशी आपण आपले लेखी/तोंडी म्हणणे सादर न केल्यास आपणांविरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार कायदेशिर एकतर्फी निर्णय घेण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

ज्याअर्थी, सदर प्रकरणी दि.१०/६/२०१४, दि.२४/६२०/१४, दि.५/७/२०१४, दि.११/७/२०१४, दि.५/८/२०१४,दि.१२/८/२०१४,दि.२७/८/२०१४,दि.१२/९/२०१४,दि.१९/९/२०१४,दि.२३/९/२०१४,दि.७/१०/२०१४ सुनावणी झालेली आहे व सुनावणीचे वेळी गैरअर्जदार क्र. १ यांचे वतीने कोणतेही म्हणने अथवा लेखी युक्तीवाद सादर करण्यात आलेला नाही. गैर अर्जदार क्र. २ सौ.मंगलाबाई नानासाहेब चौधरी यांनी लेखी म्हणने दिनांक २३.०९.२०१४ रोजी व लेखी युक्तीवाद दिनांक ०७.१०.२०१४ रोजी सादर केलेला आहे. त्याचा तपशिल थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी केलेला अर्ज खोटा असून त्यांना मान्य नाही व अर्जदार हे मौजे डोमेगांव येथील क्षेत्र १ एकरचे पूर्वीचे मालक होते. व त्यांनतर त्यांनी ती जमीन श्री.दत्तात्रय लांडगे यांना दिनांक ०१.०६.१९९८ रोजी खरेदीखत नं.६२१ नुसार करून दिलेले आहे. त्या वेळी श्री.दत्तात्रय लांडगे यांनी जमीन खरेदी करतेवेळी स्वतःची मलकापूर ता.गंगापूर येथील गट नं. २५ मधील ६ एकर जमीनी मधुन ३ एकर जमीन श्री.सखाराम राठोड यांना विकुन रु.१३०००/- मध्ये वरील एक एकर जमीनीची रजिस्ट्री करून घेतली आहे. खरेदीच्या वेळी साक्षदार म्हणून श्री.आबाराव माणिकराव सुसलादे होते व त्यांना श्री लांडगे यांनी रु.३००००/-

कमीशन दिलेले आहे. त्या वेळी त्यांच्या कोणत्याही मुलीचे लग्न नव्हते. व जमीनीचा व्यवहार पैशाने झालेला असून मुळ रक्कमेला व्याज वगैरे दिलेले नाही. जमीन खरेदी केल्या नंतर सदरची जमीन श्री.लांडगे यांनी कास्त केली. व तीन एकर जमीन विकुण मिळालेले पैसे स्टेट बॅक हैद्राबाद येथे श्री.दत्तात्रय लांडगे यांनी जमा केलेले आहे. खाते उघडते वेळी श्री.आबाराव माणिकराव सुसलादे यांची ओळख म्हणून सही आहे. व अर्जदार यांनी १६ वर्षानी तक्रार दाखल केलेली आहे. व जमीनीचा फेर १३ वर्षा नंतर करण्यात आला असून अर्जदाराचे म्हणने असे की, सदर जमीनीची खरेदी करून त्या नंतर परत एक महिन्याने श्री दत्तात्रय लांडगे यांनी त्यांनी मौजे मलकापूर ता.गंगापूर येथील गट नं.२५ मधील तीन एकर जमीन दोन वर्षासाठी श्री.हरीचंद्र जाधव यांच्याकडे रु.२००००/- मध्ये गहाण ठेवली. व ती पैशाची व्यवस्था न झाल्यामुळे श्री.हरीचंद्र जाधव यांच्याकडे तीन वर्ष राहीली. त्या नंतर त्यांना काम धंदा नसल्याने ते डोमेगांव सोडून निघुन गेले व ते १३ वर्षानंतर डोमेगांव येथे परत आले. नंतर अर्जदार यांना सोबत घेऊन जमीनीचा फेर करुन घेतला आहे. श्री.दत्तात्रय लांडगे यांनी सदरची जमीन गैर अर्जदार क्र. २ यांना विकली असून त्याची खरेदीखत दुय्यम निबंधक गंगापूर यांच्याकडे करण्यात आले असून त्याचा फेरफार क्र. १००८ दिनांक ०६.०५.२०१३ रोजी मंजूर झालेला आहे. व फेरफार मंजूर होण्याच्या मुदतीत आक्षेप आलेला नाही. व जमीनीच्या रेकॉर्डला त्यांचे नाव आहे. या व्यवहारा बाबत त्यांनी दि.०२.०२.२०१३ रोजी पुण्यनगरी औरंगाबाद या वृत्तपत्रात जाहिर प्रगटन दिलेले होते. त्या बाबत कोणतेही उत्तर व आक्षेप आलेले नाही. ज्या वेळी या जमीनीवर दिनांक ०७.०३.२०१४ रोजी सरकारी मोजणी करून घेण्याकरीता गेले असता अर्जदार व त्यांच्या मुलानी गैर अर्जदार क्र. २ वर जिवघेणा हल्ला केल्याने त्याची तक्रार पोलीस स्टेशन मध्ये केलेली आहे. श्री अर्जदार शेख नसिर शेख हुसेन यांनी लांडगे यांच्या दिनांक ०१.०६.१९९८ रोजी खरेदीखत करून दिलेले आहे. त्या खरेदीखतात कोणत्याही प्रकारची अट, शर्थ किंवा हा व्यवहार गहाण स्वरुपाचा आहे असे उल्लेख केलेले नव्हते. या प्रकरणात महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये अर्जदारास कोणताही न्यायदाद देता येत नाही. त्यामुळे त्यांचा अर्ज निकाली काढावा. अशी विंनती केली. त्यांचे लेखी युक्तीवादात त्यांनी म्हणने मांडले की, अर्जदार व दत्तात्रय लांडगे यांची सेलडिड दि.०१.०६.१९९८ ला केलेली आहे व ते लांडगे यांना अर्धे अर्धे पैसे दिले असे सांगतात. तेव्हा पासून आता पर्यंत १२ वर्ष अर्जदार काय करीत होते. तसेच त्यांनी सावकारी व्यवहारा बाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. तसेच १९९८ मध्ये कोणत्या मुलीचे लग्न होते त्या बाबत कोणताही पूरावा दिलेला नाही. व जे रुपये १३०००/- घेतलेले होते ते दोन टप्यात परत केले. त्या बाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. व लांडगे हे नाशिक येथे राहात असल्याने त्याचा फायदा घेऊन अर्जदार यांच्याकडे इललिगल जमीनीचा ताबा राहीला. साक्षीदार हे अर्जदाराच्या शेजारी राहात असल्याने त्यांचे सांगण्या वरून त्यांनी खोट शपथपत्र दाखल केले आहे. तसेच ते लांडगे यांच्या बहीनीकडे केव्हा गेले त्या बाबत काही सांगीतलेले नाही. व त्यांनी गैर अर्जदाराना त्रास देण्यासाठी जमीन हडप करण्यासाठी १६ वर्षा नंतर खोटी तक्रार दाखल केलेली आहे. अर्जदारानी गैरअर्जदार क्र. २ यांनी करून घेतलेले खरेदीखत हे खोटे आहे हे जाहिर करुन घेतलेले नाही. गैर अर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदार २ यांना रु.१७५०००/- मध्ये सदरील

REGISTRAR OF MONEYLENDERS ★ DIST AURANGABAD

जमीन विकलेली आहे. व त्या नंतर खरेदीखत झाल्यावरही व जाहिर प्रगटन दिल्या नंतरही तक्रारदार यांनी ऑब्जेक्शन घेतलेले नाही. व गैर अर्जदार क्र. २ यांनी योग्य रितिने खरेदीखत केलेले आहे व त्यांस कोठेही चॅलेंज केलेले नाही. गैरअर्जदार क्र. १ हे सावकारी व्यवहार करतात. या बाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार यांनी गैर अर्जदार नं.१ यांना करून दिलेल्या खरेदी खतात कोणत्याही प्रकारची अट व शर्थ नाही सदरील व्यवहार हा गहाण स्वरुपाचा आहे. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज जमीनीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे व जमीन हडप करण्याच्या उद्देशाने दिलेला आहे. व ती तक्रार खोटी असल्याने फेटाळण्यात यावी असा युक्तीवाद केला.व त्यासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) गाव मलकापूर ता.गंगापूर सातबारा उत्तारा दिनांक ०२.०५.१९९८

२) श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी दत्तात्रय लांडगे यांना करून दिलेले खरेदीखत दिनांक ०१.०६.१९९८

३) गट नं.११ जमीनीचा नकाशा.

४) गाव डोमेगांव ता.गंगापूर सातबारा उत्तारा दिनांक २०.०६.२०११

५) फेरफार पत्रक (नोंदवही) दिनांक १०.०९.२०११

६) प्रतिज्ञापत्र दिनांक १६.०४.१९९९

७) समर्थ कृषि सेवा केंद्र दिनांक १२.०६.१९९८

८) डोमेगांव सातबारा दिनांक २०.०६.२०११

९) जाहिर प्रगटन दिनांक १९.०२.२०१३

१०) मंगल चौधरी यांनी खरेदी केलेले जमीनीचे खरेदीखत दिनांक ०१.०४.२०१३

११)गाव डोमेगांव ता.गंगापूर सातबारा दिनांक २०.०४.२०१३

१२)फेरफार पत्रक नोंदवही दिनांक ०६.०५.२०१३

१३)भुमी अभिलेख विभाग महाराष्ट्र शासन एस.बी.एच.बँकेमध्ये ठेवण्यात आलेले रोख रक्कमेचे चलन दिनांक १८.०१.२०१४

१४) भूमापन नोंदणीसाठी अर्ज दिनांक १८.०१.२०१४

१५)सिल्लेगाव पोलीस स्टेशनला दिलेला अर्ज दिनांक ०८.०४.२०१४

१६) मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे निकालाचे सायटेशन २००८ (२) MhLj ८१९

इत्यादी कागदपत्रे सादरकेलेली आहे.

गैर अर्जदार क्र.३ यांनी त्यांचे लेखी म्हणने दि.१२/९/२०१४ रोजी सादर केलेले आहे.त्यात त्यांनी खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी दिलेला अर्ज हा खोटया मजकूराचा असून केवळ जमिनीच्या रेव्हेन्यू रेकॉर्ड मध्ये असलेल्या नावाचा गैर फायदा घेवून व गावातील लोकांशी संगनमत करून दिलेला आहे त्यामूळे तो गैरअर्जदार क्र.३ यांना मान्य नाही.अर्जदार श्री.नसिर शेख हुसेन  हे गट नं.११ मौजे डोमेगाव येथील क्षेत्र एक एकरचे पुर्वीचे मालक व कब्जेदार होते.व सदर मिळकतीतील संपुर्ण हक्क श्री दत्तात्रय माणिकराव लांडगे यांना नोंदणीकृत खरेदी खत क्र.६२१ दुय्यम निबंधक कार्यालय,गंगापूर व्दारे दि.२७/३/१९९८ रोजी कायमचे हस्तांतरण केले होत.सदर मिळकतीतील संपुर्ण हक्क हितसंबंध सदर खरेदीखतान्वये हस्तांतर केले परंतु या खरेदी खतान्वये तलाठी यांनी फेर फार घेतलेला नाही,जे की, एमएलआरसी कलम १५४ अन्वये निबंधक कार्यालयाव्दारे मा.तलाठी व तहसिलदार साहेब यांना खरेदीखताबाबत किंवा हस्तांतरणाबाबत माहिती देवून त्याबाबत फेर फार मंजूर करून रेव्हेन्यू रेकॉर्ड ला नोंद घेणे आवश्यक होते,त्यानंतर फेर फार क्र.९२८ दि.१०/९/२०११ रोजी मंजूर झालेला आहे,त्यांस कोणतेही आव्हान करण्यात आलेले नाही,त्यानंतर जवळपास १५ वर्षांनंतर १/४/२०१३ रोजी श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांनी सदर मिळकत ही श्रीमती मंगल नानासाहेब चौधरी यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र.१५१५ दुय्यम निबंधक,कार्यालय,गंगापूर व्दारे हस्तांतरण करण्यात आले होते व त्याप्रमाणे फेर फार क्र.१००८ मौजे डोमेगाव हा दि.६/५/२०१३ रोजी मंजूर झालेला आहे व रेव्हेन्यू रेकॉर्डला श्रीमती मंगल नानासाहेब चौधरी यांचे नाव लागलेले आहे .या व्यवहाराबाबत श्रीमती चौधरी यांनी दि.२०/२/२०१३  रोजी दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रातही जाहीर प्रगटन दिले होते,त्यांस आजपर्यंत कोणताही उजर किंवा आक्षेप नोंदविलेला नाही. गैरअर्जदार क्र. ३ यांनी सदर मिळकत श्रीमती मंगलबाई नानासाहेब चौधरी यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखत क्र. २८९५ दुय्यम निबंधक गंगापूर कार्यालयाद्वारे दिनांक २६.०६.२०१४ रोजी विकत घेतलेले आहे व खरेदीखता अन्वये फेरफार क्र. १०७७ मौजे डोमेगांव हा मंजूर झालेला असून गैर अर्जदार क्र. ३ यांचे नाव सातबारा उत्ताऱ्यांस लागलेले आहे. अर्जदार श्री.शेख नासेर शेख  हुसेन शेख यांनी श्री.लांडगे यांच्या  हक्कात जे नोंदणीकृत खरेदीखत दिनांक २७.०३.१९९८ रोजी करून दिले होते त्या मध्ये  कोणत्याही प्रकारची अट, शर्थ किंवा सदर व्यवहार गहाण स्वरुपाचा  आहे असे उल्लेखलेले नव्हते. अर्जदाराने सदर सावकारी बाबतचा अर्ज प्रथमतः दिनांक ०३.०२.२०१४ रोजी लोकशाही दिनात दिला होता. त्या नंतरच त्या अर्जावर तपासणी किंवा पडताळणी झाली होती. करीता या प्रकरणात कलम १८ महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अन्वये अर्जदारास कोणतीही न्यायदाद देता येत नाही. करीता सदर प्रकरण चालविण्याचा संबंध किंवा प्रश्न येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह निकाली काढण्यात यावा अशी विनंती केली. लेखी खुलाशा सोबत त्यांनी खालील प्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहे.

१) खरेदखत क्र. ६२१/९८ दिनांक २७.०३.१९९८

२) फेरफाराची नोंदवही फेरफार पत्रक क्र. ९२८ दिनांक १०.९.२०११

३) नोंदणीकृत खरेदीखत क्र. १५१५/२०१३ दिनांक ०१.०४.२०१३

REGISTRAR OF MONEYLENDERS
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

४) दैनिक पुण्यनगरी जाहिर प्रगटन दिनांक २०.०२.२०१३

५) फेरफाराची नोंदवही फेरफार पत्रक क्र. १००८ दिनांक ०६.०५.२०१३

६) गट नं. ११ चे सातबारे उत्तारे

७) खरेदखत क्र. २८९५/२०१४ दिनांक २६.०६.२०१४

८) फेरफाराची नोंदवही फेरफार पत्रक क्र. १०७७ दिनांक १२.०८.२०१४

९) गट नं. ११ चे सातबारे उत्तारे

ज्याअर्थी, सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीत चौकशी अधिकारी यांनी घेतलेले जाबजबाब व सादर केलेला चौकशी अहवाल, अभिप्राय सुनावणी मध्ये अर्जदार,गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी सादर केलेले लेखी जबाब व युक्तीवाद विचारात घेता पुढील प्रश्न निर्माण होतात. सदर प्रश्न व त्याचे उत्तर प्रश्ना समोर दिलेले आहे. व उत्ताराचे स्पष्टीकरण खाली सविस्तर नमुद करण्यांत आलेले आहे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापूर जि.औरंगाबाद यांनी श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांना करुन दिलेले खरेदीखत सावकारी अंतर्गत करून दिले आहे काय ? | होय |
| २ | प्रश्न क्र. १ चे उत्तर होय असल्यास त्या बाबतचे स्पष्टीकरण काय ? | खाली दिलेले आहे |
| ३ | अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापूर जि.औरंगाबाद यांनी त्यांची शेतजमीन (मालमत्ता) जी अवैध सावकारीच्या व्यवहारात गहाण (खरेदी खतावर) ठेवली असल्याचे दिसून आल्यामूळे सदर खरेदीखत सावकारीच्या ओघात गैरअर्जदार सावकाराने दिलेल्या कर्जाबददल अर्जदाराने गैअर्जदार अवैध सावकारास प्रतिभूती म्हणून दिली आहे.ते अभिहस्तांतरण अवैध असल्याचे घोषित करून सदर मालमत्ता जमीन/मालमत्ता हि महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळ मालक/अर्जदार यांच्या नावावर पुन्हा करणे योग्य आहे काय? | होय. |
| ४ | उत्तर होय असल्यांस याबाबतचे स्पष्टीकरण काय आहे? | खाली दिलेले आहे. |

**<u>प्रश्न क्र.१ चे उत्तर होय दिलेले आहे,त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे:-</u>** अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी गैरअर्जदार क्र.१ यांचेकडून मूलीचे लग्नासाठी रूपये १३,०००/- प्रति शेकडा ५% प्रमाणे व्याजाने सन १९९८ मधे घेतलेले होते व त्याबद्यल धर म्हणून त्यांची डोमेगाव शिवारातील गट नं.११ मधील एक एकर जमीन

दिनांक **२७/०३/१९९८ रोजी नोंदणीकृत खरेदीखत** करून दिलेले आहे व अर्जदार यांनी सादर केलेल्या पुरावे कागदपत्रानुसार जसे ७/१२ उतारा यावरून सदर जमीन खरेदीपुर्वी व खरेदीनंतर सन १९९८ ते आजपर्यंत अर्जदार यांच्या ताब्यात आहे तसेच हया शेतजमिनीचा फेर गैरअर्जदार यांच्या नावाने फेर क्रमांक ९२८ दिनांक ०४/०८/२०११ नुसार झालेला आहे म्हणजेच सदर जमिनीचा फेर तब्बल (१३) वर्षांनी अर्जदार यांचे नावाने झालेला आहे.तसेच गैरअर्जदार क्र.१ हयांनी सदर जमीन गैरअर्जदार क्र.२ यांना खरेदीखत क्रमांक १५१५ दिनांक २२/०३/२०१३ रोजी रू.१,७५,०००/- नुसार विक्री केलेली आहे.ही शेतजमीन विक्री झाल्यावरही सदरची शेतजमीन ही अर्जदार यांचेच ताब्यात आहे.तसेच गैरअर्जदार क्र.२ यांनी हीच शेतजमीन तक्रार झाल्यानंतर चौकशी चालु असतांना गैरअर्जदार क्र.३ यांना खरेदीखत क्र.२८९५ दिनांक २६/६/२०१४ नुसार रू.१,७५,०००/- मधे विक्री केलेली आहे व हयानंतरही ही शेतजमीन अर्जदार यांचेच ताब्यात आहे.तसेच गैरअर्जदार क्र.१ यांना गैरअर्जदार क्र.(२) व (३) यांनी सदर जमीनीचे व्यवहाराबाबत जवाब देणेकामी चौकशी अधिकारी यांचेसमोर व सुनावणीच्या वेळी म्हणणे मांडणेस्तव हजर केले नाही व ते हजर झाले नाही त्यामूळे गैरअर्जदार क्र.१ यांचे बाबत दि.१४/९/२०१४ रोजी दैनिक दिव्य मराठी या वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसारही गैरअर्जदार क्र.१ हे हजर झाले नसल्याने त्यांना या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरण्यात येत आहे.

REGISTRAR OF MONEY ... DIST. AURANGABAD

या व्यवहारातील साक्षीदार श्री.आबाराव माणिकराव सुसलादे यांनी त्यांचा जबाब चौकशी अधिकारी यांचेसमोर दि.२७/३/२०१४ रोजी सादर केला आहे,त्यांत त्यांनी नमूद केले आहे की, श्री.शेख नसिर शेख हुसेन यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज असल्यामूळे सन १९९८ मध्ये त्यांनी गावातीलच श्री.दत्तात्रय माणिकराव लांडगे यांचेकडून ५% दराने रू.१३,०००/- व्याजाने घेतले होते,त्या कर्जाचे वेळी ते समक्ष हजर होते या कर्जाच्यावेळी ते समक्ष हजर होते व दोघामध्ये पैसे देणे घेणेचा व्यवहार झालेला होता व या बाबत श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी त्यांचे जमीनीचे खरेदीखत रू.१३,०००/- नमूद नुसार श्री.दत्तात्रय लांडगे यांना करुन दिले होते.ज्यावेळी श्री.शेख नसिर शेख हुसेन यांनी जवळपास दोन वर्षानंतर वरील कर्जाची एकुण व्याजासह रु.२५०००/-त्यांचे समोर श्री.दत्तत्रय माणीकराव लांडगे यांना दिले व गंगापुर येथे खरेदीखत करुन घेणेसाठी त्यांना बोलविले परंतु दत्तु लांडगे हे स्वतः गंगापुर येथे आले नाही.ते गावाकडे आले नसल्याने व ते गावात राहत नसल्याने ते स्वतःत्यांना पाहण्यासाठी निफाड येथे गेले तथापी ते पुण्याला गेल्याचे कळले व त्यानंतर बरेच दिवसापासुन ते गावात आलेले नाही.व त्यांच्या माहितीप्रमाणे दोघामध्ये झालेला पैसे देणे घेण्याचा व्यवहार हा सावकारी मधुनच झालेला असुन व्याजासह रक्कम परत केल्यानंतर देखील श्री.दत्तु लांडगे यांनी शेख नसिर शेख हुसेन शेख यांचे जमीनीचे खरेदीखत परत न करता त्यांची फसवणुक केलेली आहे.असा जवाब लिहुन दिलेला आहे.गैरअर्जदार (२) व (३) यांनी अर्जदार व गैरअर्जदार क्र.(१) यांचेतील व्यवहार हा सावकारीचा नसुन खरेदी विक्रीचा आहे.हे सिध्द करू शकले नाहीत.व गैरअर्जदार क्र.(१) सुनावणीस हजर झाले नाही.व त्यांनी जबाबही सादर केलेला नाही.या सर्व बाबी विचारात घेता असे दिसून येते की,अर्जदार यांनी खरेदीखतापोटी करून दिलेली गट क्र.११ मधील एक एकर जमीन सन १९९८ पासून ते आजपर्यंत त्यांचेच ताब्यात आहे.व त्या जमिनीमध्ये ते

घर करून राहात असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे.तसेच अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचेतील व्यवहार हा खरेदी विक्रीचा नसून सावकारीचा असल्याबाबत व्यवहारातील साक्षीदार श्री आबाराव माणिकराव सुसलादे यांनी जबाबात लिहुन दिलेले आहे.तसेच दिनांक १०/६/२०१४ रोजी झालेल्या सुनावणीत इतर दोन साक्षीदार श्री.शाहाजी तात्याबा सुसलादे व श्री. भालचंद्र भरवडेकर यांनी या बाबत अर्जदाराचे बाजुने म्हणणे मांडलेले आहे..या सर्व बाबी पाहता अर्जदार व गैरअर्जदार क्र.(१) चे उत्तर होय दिलेले आहे.प्रश्न क्र.(२) नुसार या बाबत वरील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

**प्रश्न (३) नुसार अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन** यांनी त्यांची शेतजमीन (मालमत्ता) ही अवैध सावकारीच्या व्यवहारात खरेदी केली असल्याचे दिसुन आल्यामुळे सदर खरेदीखत सावकारीच्या ओघात गैरअर्जदार सावकाराने दिलेल्या कर्जाबद्यल अर्जदाराने गैरअर्जदार अवैध सावकारास प्रतिभुती म्हणुन दिली आहे.ते अभिहंस्तातरण अवैध असल्याचे घोषीत करुन सदर मालमत्ता (जमीन मालमत्ता) ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळमालक /अर्जदार यांच्या नावावर पुन्हा करुन देणे योग्य आहे काय ? **या प्रश्नाचे उत्तर होय दिलेले आहे.त्याचे स्पष्टीकरण पूढील प्रमाणे आहे.**

प्रश्न क्र.(१) नुसार डोमेगाव शिवारातील जमीन गट क्र.११ क्षेत्र एक एकर गैरअर्जदार सावकार श्री.दत्तात्रय माणीकराव लांडगे यांनी अवैध सावकारीच्या स्वरुपात खरेदीखताव्दारे नावावर करुन घेतल्याचे सिध्द झालेले आहे.तसेच अर्जदार यांनी मुलीचे लग्नासाठी घेतलेल्या रु.१३०००/ चे शेकडा ५% प्रमाणे रु २५०००/- साक्षीदारा समक्ष देऊनही त्यांनी सावकारी व्यवहारात ठेवलेली गहान मालमत्ता गट क्र. (११) डोमेगांव शिवारातील जी की,नोंदणीकृत खरेदीखता व्दारे  गैरअर्जदार यांचे नावे केलेली होती ती परत करुन दिलेली नाही.सदर मलमत्तेचा ताबा प्रत्यक्ष आजही अर्जदार यांचेकडेच आहे.व हया शेतजमीनीचा फेर ११ वर्षानी गैरअर्जदार यांनी करुन घेतलेला आहे.गैरअर्जदार क्र.१ यांना अनेक वेळा परिपुर्ण संधी देवून वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन करुनही सुनावणीस हजर झाले नाही.म्हणून सदर व्यवहाराबाबत त्यांना काही म्हणावयाचे नाही असे दिसुन येते.गैरअर्जदार क्र.(२) व (३) हयांनी सुध्दा त्यांनी खरेदीखत करणेपूर्वीचा अर्जदार व गैरअर्जदार क्र.(१) यांचा व्यवहार हा खरेदीविक्रीचा आहे हे सिध्द केलेले नाही. गैरअर्जदार यांचे स्पष्टीकरण व वरील बाब विचारात घेता गैरअर्जदार क्र. (१) श्री.दत्तात्रय माणीकराव लांडगे यांनी डोमेगांव शिवारातील गट क्र.११ मधील १ एकर जमीन सावकारीच्या ओघात अवैध सावकारीत प्रतिभूती म्हणुन घेतलीली आहे.म्हणुन ते अभिहस्तांतर अवैध आहे.त्यामुळे ही शेतजमीन महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार मुळ अर्जदार यांचे नावावर करुन देणे योग्य आहे.म्हणुन प्रश्न ३ चे उत्तर होय दिलेले आहे.

त्याअर्थी अर्जदार श्री. शेख नसिर शेख हुसेन तक्रारीत नमुद केलेल्या बाबी व त्यांनी त्यानुषंगाने सादर केलेले पुरावे, प्राप्त जाबजवाब, चौकशी अधिकारी यांनी नोंदविलेले संबंधीत साक्षीदाराने सादर केलेले शपथपत्र ,गैरअर्जदार क्र.२, व ३ यांच्या  वतीने तक्रारी च्या अनुषंगाने सादर केलेले म्हणणे व सुनावणी दरम्यान केलेला

OF MONEYLENDING, सत्यमेव जयते, DIST. AURANGABAD

युक्तीवाद व तक्रार अर्जदाराचा जमीनीचा प्रत्यक्ष ताबा विचारात घेता या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**-: <u>आदेश</u> : -**

मी एन. व्ही.आघाव सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था औरंगाबाद महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन अर्जदार श्री.शेख नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापुर यांनी त्यांची शेत जमीन गट क्र.११ मधील १ एकर जमीन डोमेगांव शिवरातील जी अवैध सावकारीच्या व्यवहारात खरेदीखता व्दारे लिहून दिल्याचे दिसून आल्यामुळे सदर खरेदीखत सावकारीच्या ओघात गैरअर्जदार सावकाराने दिलेल्या कर्जाबदल अर्जदाराने गैरअर्जदार अवैध सावकारास प्रतिभुती म्हणुन दिली असल्याची माझी खात्री झाली आहे.त्यामुळे गैरअर्जदार १ श्री.दत्तात्रय माणीकराव लांडगे यांनी गैरअर्जदार क्र.२ सौ.मंगलबाई नानासाहेब चौधरी यांना दि.२२/३/२०१३ रोजी खरेदीखत करुन दिलेले आणी गैरअर्जदार क्र.२ सौ.मंगलबाई नानासाहेब चौधरी यांनी गैरअर्जदार क्र.३ श्री.वसंत रतन निकम यांना दि.२६/६/२०१४ रोजी करुन दिलेले सदर जमीनीचे खरदीखत रद्य करुन सदर शेतजमीन ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळ मालक श्री.शेख नसिर शेख हुसेन रा.डोमेगांव ता.गंगापुर यांच्या नावाने पुन्हा करुन देणेबाबत आदेशित करीत आहे.

सदर आदेश आज दिनांक २८/११/२०१४ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

REGISTRAR OF MONEY LENDER DIST. AURANGABAD

(एन.व्ही.आघाव)
सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद

**प्रत -**

१.मा.जिल्हाधिकारी ,औरंगाबाद यांना त्यांचे लोकशाही दिनातील तक्रारी संदर्भातील पत्र दि.३/२/२०१४ च्या अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर.

२.मा.उप विभागीय अधिकारी वैजापुर यांना पुढील कार्यवाहीस्तव

३.मा.तहसिलदार गंगापुर यांना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्त देण्यात येते.

४.तलाठी सजा डोमेगांव ता.गंगापुर यांना पुढील कार्यवाहीस्तव.

५.सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,गंगापूर यांना त्यांचा चौकशी अहवाल दि.२१/४/२०१४ च्या संदर्भांत कार्यवाहीस्तव.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.-**

१.मा.सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे

२.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद

सावकारांचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद